प्रेसनोट दि. २१/०९/२०१८

**जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीतील सायबर क्राईम सेल, पुणे शहर येथील प्राप्त तक्रारी अर्जातील डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम रुपये ३,९३,२२,४९०/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली.**

सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर येथे तक्रारी विषयक दरमहा साधारपणे ४५० अर्ज प्राप्त होतात. तर दिवसाला १४ ते १५ अर्ज प्राप्त होतात. त्यामध्ये डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉड, सोशल मिडीयाचा वापर करुन बदनामी, जॉब फ्रॉड, लॉटरी फ्रॉड, इ. प्रकारचे अर्ज प्राप्त होत असतात.

त्यापैकी डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम जर माहिती (ओटीपी) शेअर केला गेला असेल तर बँकेकडून सदर रक्कम रिफंड केली जात नाही. अशा प्रकारच्या अर्जामध्ये पैसे विविध मर्चंट / वॉलेट पैसे गेले असतात सायबर सेल, संबंधित मर्चंट / वॉलेट यांना मेलद्वारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्याची रक्कम रिफंड करुन दिली जाते.

दुस-या प्रकारात ओटीपी शेअर केला नसेल किंवा अर्जदार यांचे डेबीट / क्रेडीट कार्ड त्याच्या ताब्यात असताना सुध्दा त्याच्या खात्यावरील रक्कम काढली जाते अशावेळी सायबर सेल मार्फत त्याची रक्कम परत मिळवुन देण्यासाठी आणि पुढील अर्ज चौकशीसाठी मेलद्वारे सदर बँकला पत्रव्यवहार केला जातो. अशा वेळी ठराविक दिवसानंतर अर्जदार यांची रक्कम संबंधित बँकेमार्फत किंवा मर्चंट/वॉलेट द्वारे अर्जदार यांचे अकाउंटला परत केली जाते. अशाप्रकारे अर्जदार नामे शाजिब मुजुमदार यांची ऑनलाईन शॉपी चॉईस या वेबसाईटवरुन टिव्ही खरेदी करण्यासाठी ५२,७५६/- रु. ऑनलाइन पध्दतीने भरले होते सदरबाबत संबंधित मर्चंट/वॉलेट यांना पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार नामे सुजाता पाटील यांना फोन करुन त्याचे क्रेडीट कार्ड वरील रिवार्ड पॉईंट देण्याचे आमिष दाखवून त्याच्या क्रेडीट कार्डची माहिती शेअर करुन त्याची २४,९३८/- रु. ची आर्थिक फसवणुक केली होती. सदर प्रकारात संबंधित मर्चंट/वॉलेट यांचेशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त ज्योती प्रिया सिंह, सहायक पोलीस आयुक्त निलेश मोरे, पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि रुपाली पवार, कर्मचारी पोशि राजेश पिंप्रीकर व मपोशि माधुरी डोक यांच्या पथकाने केली आहे.

१ जानेवारी ते २० सप्टेंबर २०१८ या कालावधीत सायबर क्राईम सेल, पुणे शहर येथे १७३३ अर्जात डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉड असलेले अर्ज प्राप्त असुन त्यामध्ये अर्जदाराची आर्थिक फसवणुक झालेली आहे. सदर अर्जापैकी २३६ अर्जात अर्जदाराची गेलेली रक्कम रुपये ३,९३,२२,४९०/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली आहे.

पोलीस उप-आयुक्त
आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर


CYBER CRIME CELL
CRIME BRANCH, PUNE